सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

## महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

### महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कार्यालयामध्ये रिक्त असलेली पदे रोजंदारी तत्वावर (Daily Wages) तात्पुरत्या स्वरुपात भरणेबाबत

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणात वाहनचालकांची ३ पदे रोजंदारी तत्त्वावर (Daily Wages) तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी ईच्छुक उमेदवारांनी **१६ ऑक्टोबर, २०२०** पर्यंत पत्त्यावर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतींसह अर्ज शीघ्र टपालाने सादर करावेत.

<u>प्राधिकरण कार्यालयात रोजंदारीवर भरावयाच्या वाहनचालकाच्या नेमणूकीसाठी अटी व शर्ती</u>

१. अ) <u>शैक्षणिक अर्हता</u> : अ) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त असलेली व्यक्ती किमान दहावी/बारावी उत्तीर्ण असावी. तसेच वाहनचालकास मराठी लिहिता, वाचता येणे आवश्यक राहील व हिंदी, इंग्रजीचे किमान ज्ञान आवश्यक राहील.

ब) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त केलेल्या वाहनचालकाजवळ वाहन चालविण्याची वैध अनुज्ञाप्ती असेल.

ब) <u>वय</u> : रोजंदारीवरील वाहनचालकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.

क) <u>अनुभव</u> : वाहनचालक म्हणून किमान ३ वर्षांचा अनुभव असावा. प्राधिकरणातील अनुभव असणा-यास प्राधान्य.

२. <u>वेतन</u> : अ) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त होणा-या व्यक्तीस दररोज रु. ९५५/- देण्यात येईल.

ब) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त होणा-या व्यक्तीस कार्यालयीन कामाच्या वेळेनंतर काम केल्यास प्रति तासाला रु. ४०/- प्रमाणे अतिकालिक भत्ता अनुज्ञेय असेल.

क) रोजंदारीवर नियुक्त होणा-या वाहनचालकास उपस्थित दिवसांचे वेतन अदा करण्यात येईल. मात्र इतर सार्वजनिक सुट्टीचे वेतन त्याला अनुज्ञेय असणार नाही.

३. <u>रजा</u> : वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त केलेल्या व्यक्तीस अनुपस्थित दिवसाचे वेतन देय होणार नाही.

४. <u>वर्तन</u> : अ) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त केलेली व्यक्ती गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली नसावी. संबंधित पोलीस स्टेशनकडून वर्तणूक तपासणी करण्यात येईल. गुन्हेगारी पार्श्वभूमी निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती संपुष्टात येईल.

**9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005.**
**Tel.: +91-22-2215 2019, Email : mwrra@mwrra.in I Website : www.mwrra.org**

तसेच कर्तव्यावर असताना वाहनचालकाची वागणूक शिष्ट संमत असेल. (उदा. वाहनचालकाने वाहतूकीचे नियम पाळणे, वागणूक सौजन्याची ठेवणे, वाहनाजवळ उपलब्ध असणे), वाहनचालकाकडे मोबाईल असावा, तथापि वाहन चालवित असताना मोबाईलचा वापर करणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

ब) वाहनचालकाने प्राधिकरणाच्या कामकाजाच्या कालावधीत नशापान/धूम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करु नये.

५. प्राधिकरणाच्या कार्यालयाचे कामकाज आठवडयातील सोमवार ते शुक्रवार व अपवादात्मक परिस्थितीत सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील चालू राहील. कार्यालयीन वेळ सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०६.१५ अशी आहे. तथापि वाहनचालकांची कामकाजाची वेळ कार्यालयीन वेळेच्या एक तास आधी व एक तास नंतर (सकाळी ०८.३० ते सायंकाळी ०७.१५) अशी राहील.

६. वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त होणा-या व्यक्तीस प्राधिकरणातील कोणत्याही पदावर नियुक्तीचा हक्क राहणार नाही.

७. वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त होणा-या व्यक्तीने ज्या कामासाठी नियुक्ती दिली आहे, ते काम सचोटीने व प्रामाणिकपणे करणे बंधनकारक राहील.

८. वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त केलेल्या व्यक्तीचे काम समाधानकारक नाही असे प्राधिकरणाच्या निदर्शनास आल्यास त्याला नोटीस न देता, त्याची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

९. वाहनास अपघात झाल्यास व दुर्देवाने वाहनचालकास कोणत्याही स्वरुपाची वा गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहनचालकास वैद्यकीय खर्चाची अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर असणार नाही. परंतु, वाहनाच्या विम्या संदर्भातील विमा कंपनीच्या धोरणानुसार अनुज्ञेय नुकसान भरपाई अनुज्ञेय ठरेल.

१०. वाहनचालकास त्याचेकडे दिलेले वाहन दुस-या कोणत्याही व्यक्तीस देता येणार नाही.

११. वाहन प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या ठिकाणी वाहनतळावर ठेवण्याची जबाबदारी वाहनचालकाची राहील. इतर दुस-या ठिकाणी वाहन पार्क करता येणार नाही. त्याकरिता प्राधिकरणाचे सचिव यांची रितसर परवानगी घ्यावी लागेल.

**टीप :** १) शैक्षणिक अर्हता, वाहन परवाना प्रमाणपत्र, अनुभव याबाबतच्या प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) वाहनचालकांच्या पदसंख्येत परिस्थितीनुरूप बदल होऊ शकतो.

स्थळ - मुंबई

दिनांक -०९.१०.२०२०

सचिव

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई